# सेंपरिटचे आरोग्य आणि सुरक्षितता, पर्यावरण, ऊर्जा आणि गुणवत्ता धोरण

Health Safety Environment Energy Quality

सेंपरिट AG Holding हा आंतरराष्ट्रीय-अभिमुख असा समूह आहे जो वैद्यकीय आणि औद्योगिक क्षेत्रातील अत्यंत विशिष्ट उत्पादने विकसित करतो, तयार करतो आणि विकतो. सेंपरिट ब्रँडचे दीर्घकालीन यश प्रामुख्याने रबर आणि प्लास्टिक यांवरील प्रक्रियेच्या क्षेत्रामधील ज्ञान आणि क्षमता यावर तसेच आमचे भागीदार दररोज आमच्यावर ठेवत असलेल्या विश्वासावर आधारित आहे. अत्याधुनिकता टिकवण्यासाठी आणि आमच्या ग्राहकांना त्यांची सवयीची असलेली गुणवत्ता आणि विश्वासार्हता देण्यासाठी आम्ही स्वतःला सतत विकसित करतो.

आम्ही अशी उत्पादने, वस्तू आणि सेवा प्रदान करतो जी ग्राहकांच्या आणि संबंधित वैधानिक व नियामक आवश्यकता पूर्ण करतात आणि ग्राहकांचे समाधान वाढवतात. लोकांचे आणि पर्यावरणाचे संरक्षण करत असताना आमच्या क्रिया, प्रक्रिया आणि उत्पादनांची गुणवत्ता यामध्ये सातत्याने सुधारणा करण्याची आमची क्षमता यावर हे यश अवलंबून असते. आरोग्य, सुरक्षितता, पर्यावरण, ऊर्जा आणि गुणवत्ता (HSEQ) हे आमच्या व्यवसायाचे अविभाज्य भाग आहेत. आम्ही आमच्या कंत्राटदार, पुरवठादार आणि इतर व्यावसायिक भागीदार यांनी या धोरणामध्ये आणि आमच्या व्यवस्थापन प्रणालीमध्ये नमूद केलेल्या तत्त्वांचा अवलंब करण्याची अपेक्षा करतो. हे धोरण आमची कॉर्पोरेट मूल्ये आणि मानके प्रतिबिंबित करते आणि त्याचे नियमितपणे पुनरावलोकन केले जाते.

## आमची तत्त्वे

- आम्ही ज्या देशात व्यवसाय करतो त्या प्रत्येक देशातील कायदेशीर आवश्यकता आणि इतर लागू असलेल्या आवश्यकतांचे आम्ही पालन करतो, तसेच OH&S प्रकरणांच्या बाबतीत आमच्या कर्मचाऱ्यांचा आणि त्यांच्या प्रतिनिधींचा सल्लामसलत आणि सहभाग सुनिश्चित करतो.
- सर्व कर्मचाऱ्यांनी शाश्वत सुधारणांसाठी सक्रियतेने काम करणे आणि व्यस्त असणे आवश्यक आहे. सुधारणांसाठीच्या सूचना कार्यक्षमतेसाठी तपासल्या जातात आणि योग्य असेल तेथे वेगवान अंमलबजावणीद्वारे त्यांना मान्यता मिळते.
- आमचे लक्ष्य, उद्दिष्टे आणि कार्यक्रम परिभाषित करण्याचा पाया म्हणून आम्ही या HESQ-विचारसरणीला मानतो ज्याने सर्व स्तरांवर सातत्यपूर्ण सुधारणा साध्य करता येते. आमच्या लक्ष्यांपर्यंत पोहोचण्यासाठी, आम्ही योग्य प्रशिक्षण, माहिती आणि सूचना तसेच योग्य त्या जागतिक मानकांच्या अंमलबजावणीद्वारे आणि संबंधित संसाधनांच्या तरतुदीद्वारे आमच्या सर्व कर्मचाऱ्यांची क्षमता आणि जागरूकता यांमध्ये पद्धतशीरपणे सुधारणा करतो.
- आम्ही खात्री करतो की सर्व कर्मचाऱ्यांना आमच्या सेंपरिट एकत्रित व्यवस्थापन प्रणाली पूर्ण करण्यातील आणि देखभाल करण्यातील त्यांची भूमिका आणि जबाबदारी यांची जाणीव आहे.
- आम्ही कोणतीही आपत्कालीन परिस्थिती, संकट आणि व्यवसायातील व्यत्यय यासाठी योजना तयार करतो, प्रतिसाद देतो आणि त्यातून मार्ग काढतो. HSEQ संबंधित कोणत्याही चिंतेचे पुनरावलोकन केले जाईल आणि योग्य कार्यवाहीसह त्यास प्रतिसाद दिला जाईल.

### आरोग्य आणि सुरक्षितता

- “शून्य घटना” बद्दलची आमचे लक्ष्य साध्य करण्यासाठी आम्ही असे अधोरेखित करतो की कोणतेही काम इतके महत्त्वाचे असू शकत नाही की ज्यामुळे सुरक्षितता आणि आरोग्याचा धोका निर्माण होईल.
- आम्ही सर्वोच्च सुरक्षिततेसाठी आमच्या कर्मचाऱ्यांना, ग्राहकांना, अभ्यागतांना, पुरवठादारांना, कंत्राटदारांना आणि इतर मुख्य संबंधित व्यक्तींना, अपघात आणि कामाशी संबंधित आजार यांपासून जास्तीत जास्त सुरक्षित ठेवण्यासाठी आणि धोके ओळखून ते सर्वात खालच्या पातळीपर्यंत कमी करण्यासाठी आणि रोखण्यासाठी आमच्या कामाच्या जागांचे आराखडे तयार करतो, ते व्यवस्थापित करतो आणि ते संचालित करतो.
- आम्ही आरोग्यावर आणि सुरक्षिततेवर होणारा परिणाम कमी करण्यासाठी आमच्या उत्पादनांमध्ये आणि प्रक्रियांमध्ये वापरली जाणारी हानिकारक रसायने आणि पदार्थ टाळण्याचा आणि ते बदली करण्याचा प्रयत्न करतो.
- आम्ही कामाच्या ठिकाणची स्थिती, आरोग्य प्रोत्साहन कार्यक्रम आणि वैद्यकीय सेवा सुधारून आमच्या कर्मचाऱ्यांच्या आरोग्यावर लक्ष केंद्रित करतो.
- आम्ही आमच्या कर्मचाऱ्यांना आवश्यक असणारी कोणत्याही प्रकारची वैयक्तिक संरक्षक उपकरणे पुरवली.

### पर्यावरण आणि ऊर्जा

- आम्ही अशा प्रक्रिया, उत्पादने आणि सेवा विकसित करतो जी उत्पादनाच्या संपूर्ण जीवनचक्रात शाश्वत पर्यावरणीय सुरक्षिततेला - विशेषत: हवामान-बदल कमी करण्यासाठी - महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत.
- आम्ही संसाधनांचा कार्यक्षमतेने वापर करतो आणि आमच्या सर्व प्रक्रियांसाठी आवश्यक घटक म्हणून माती, हवा, पाणी आणि कचऱ्याचे उत्सर्जन यांसारख्या प्रदूषणाला प्रतिबंध करतो. जिथे शक्य असेल तिथे आम्ही अंतर्गतपणे साहित्यांचा पुनर्वापर करतो आणि पुनर्वापर केलेल्या साहित्यांच्या वापरास चालना देतो.
- आम्ही ऊर्जेची कार्यक्षमता आणि $CO_2$ चे उत्सर्जन कमी करणे, पाण्याचा वापर आणि कचरा कमी करणे यांना आमच्या शाश्वत कामगिरीचा एक महत्त्वाचा पैलू मानतो.
- आम्ही रसायने आणि धोकादायक पदार्थांच्या सुरक्षित हाताळणीची आणि साठवणुकीची काळजी घेतो.

### गुणवत्ता

- गुणवत्ता म्हणजे आमच्या कामातील एक आवश्यक पैलू असल्याचे आम्ही समजतो आणि गुणवत्तेची संकल्पना सर्व प्रक्रिया आणि सेवांमध्ये विस्तारित करण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील राहतो.
- आम्ही शक्य तितक्या सर्वात किफायतशीर पद्धतीने “शून्य दोष विचारसरणी” वर आधारित उत्पादने आमच्या ग्राहकांच्या आणि उत्पादनांच्या आवश्यकतेनुसार तयार करतो.
- आम्ही आमचे पुरवठादार आणि ग्राहक यांच्यासाठी उत्पादनाची गुणवत्ता, तांत्रिक प्रगती आणि किफायतशीर किंमत या बाबतीत अत्यंत विश्वासार्ह दीर्घकालीन भागीदार आहोत.
- आम्ही आमच्या ग्राहकांना संभाव्य सुधारणा ओळखण्यासाठी अभिप्राय विचारतो.
- आम्ही उत्पादनाच्या आराखड्यापासून ते उत्पादन, विक्री आणि विक्रीपश्चात सेवा या सर्व प्रक्रियांमध्ये उत्पादनाची सुरक्षितता राखण्यासाठी उपाययोजना राबवितो.

Version 5 – 03/2022

सातत्यपूर्ण सुधारणेतूनच शाश्वत स्पर्धात्मकता आणि यशाची हमी प्राप्त होते हे अधोरेखित करून व्यवस्थापन मंडळ आणि सर्व कर्मचारी या HSEQ धोरणाला संपूर्णपणे वचनबद्ध आहेत!

**The Executive Board**
Semperit AG Holding

SEMPERIT